# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.02.2026** **वार- गुरुवार**

---

**शिवजयंती**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज पुणे शहर आणि जिल्ह्यात अत्यंत उत्साहात साजरी केली जात आहे.

जुन्नरमधील शिवनेरी गडावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, यांच्या उपस्थितीत शिवजन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात साजरा झाला. छत्रपती शिवाजी महाराज नसते, तर भारताचा इतिहास आणि भूगोल, आज आपण पाहतो तसा उरला नसता," अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी शिवरायांच्या अलौकिक कार्याला वंदन केलं. शिवरायांनी दिलेला मार्ग, हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे, शिवरायांच्या कार्याचा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३०मध्ये ४००वी शिवजयंती जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, अशी घोषणा यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष देणारे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले आहेत, असं सांगून, राज्यातील सर्व गड-किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचं फडणवीस म्हणाले.

शिवरायांच्या विचारांचा आदर्श समोर ठेऊन, बलशाली आणि स्वाभिमानी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

तर शिवछत्रपतींच्या स्वप्नातील स्वराज्य घडवण्यासाठी; महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध राहील, अशी ग्वाही सुनेत्रा पवार यांनी यावेळी दिली.

शिवनेरीवरील शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायला. पोलीसांच्या बँड पथकाने राष्ट्रगीत आणि राज्यगीताची धून वाजवली, तसंच बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. शालेय विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनातील प्रसंग तसंच साहसी क्रीडाप्रकार सादर केले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विविध मान्यवरांना शिवनेरी भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले.

क्रीडा मंत्रालय, पुणे जिल्हा प्रशासन आणि पुणे महानगरपालिकेनं शिवजयंतीनिमित्त आज 'मेरा युवा भारत'' या भव्य पदयात्रेचं आयोजन केलं होतं. महापौर मंजुषा नागपुरे यांनी शनिवार वाडा इथून या पदयात्रेचा प्रारंभ केला. यावेळी ढोल ताशांचा गजर आणि जय भवानी, जय शिवाजी, हर हर महादेव, अशा घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

पुण्यात शिवजयंती महोत्सव समितीनं आयोजित केलेला शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा देखील आज मोठ्या उत्साहात पार पडला. लाल महालातून निघालेल्या या मिरवणुकीत आकर्षक फुलांनी सजवलेला मुख्य रथ आणि त्यामागोमाग विविध सरदार, मावळ्यांच्या घराण्यांतील ९६ स्वराज्य रथांनी शिवरायांना मानवंदना दिली. ५१ रणशिंगांची ललकारी, ढोल ताशा पथकांचा गजर आणि ५१

रणरागिणींनी केलेलं युद्धकलेचं सादरीकारण; यामुळे हा सोहळा चित्तवेधक ठरला. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते सोहळ्याचं उद्घाटन झालं.

शिवाजीनगर इथल्या एसएसपीएमएस संस्थेच्या प्रांगणातील शिवरायांच्या भव्य अश्वारुढ स्मारकावर यावेळी हेलीकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली.
सरसेनापती हंबीरराव मोहिते स्वराज्यरथ सोहळ्यात व्यसनमुक्तीचा अनोखा संदेश देण्यात आला. व्यसनरूपी राक्षसावर शिवविचारांचा प्रहार करूया... सुसंस्कृत स्वराज्यासाठी व्यसनमुक्त समाज घडवूया...... असे फलक या स्वराज्यरथ सोहळ्यात झळकले.

शिवरायांच्या पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या इतिहासाचा जागतिक गौरव करण्याच्या उद्देशाने न्यूयॉर्कमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा आज करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज प्रतिष्ठान आणि शिंदे सरकार फाउंडेशन संयुक्तपणे हा उपक्रम राबवणार आहे.

शिवजयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेने आयोजित केलेल्या प्रबोधन पर्वाचं नामवंत शाहिरांनी पोवाड्यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचं जीवनचरित्र सादर केलं.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्तानं शोभायात्रा, विविध स्पर्धा, व्याख्यानं आणि सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आले.

**भांडारकर**

पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर संस्थेच्या संग्रहातील महत्त्वाची हस्तलिखितं, ग्रंथ आणि मौल्यवान वस्तूंचा तसंच संशोधन प्रकल्पांचं "ज्ञानसागर" हे प्रदर्शन येत्या शनिवारपासून सुरु होत आहे.

23 फेब्रुवारीपर्यंत दररोज सकाळी 10 ते रात्री आठ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी मोफत खुलं राहणार आहे, अशी माहिती कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन यांनी आज दिली.

**<u>पुणेपोलिस</u>**

पुणे शहरात मुलांचं अपहरण करणारी टोळी सक्रीय असल्याच्या अफवा समाज माध्यमांवर पसरत आहेत. मात्र अशा प्रकारची कोणतीही टोळी अस्तित्वात नाही, या निव्वळ अफवा आहेत, नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावं, असं आवाहन पुणे पोलिसांनी केलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र असून कमाल तापमान ३२  तर किमान तापमान १८ पूर्णांक ४ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण असंच राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!**